# <u>डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. (शेड्यूल्ड बँक)</u>

## <u>भागधारक कल्याण निधी</u>

**<u>(दि. २५ सप्टेंबर २०१५ रोजीपासून लागू)</u>**

**<u>- भागधारक कल्याण निधी - नियम व अटी -</u>**

१) लाभार्थी योजनेप्रमाणे लाभ घेणारी व्यक्ती ही मागील दोन वर्षांच्या संपूर्ण कालावधीसाठी बँकेचे सभासद असणे जरुरीचे आहे. **<u>अत्यंत अपवादात्मक व समर्थनीय प्रकरणी सदरच्या नियमात काही प्रमाणात सवलत देण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.</u>**

२) भागधारक कल्याण निधीच्या लाभार्थी योजनेचे फायदे बँकेच्या सहसभासदास मिळणार नाहीत.

३) भागधारक कल्याण निधीच्या लाभार्थी योजनेचे फायदे बँकेच्या सक्रीय सभासदासच मिळतील.
(<u>सक्रीय सभासदाची व्याख्या :-</u> ज्या सभासदाचे भाग-भांडवल ₹ १,५००/- आहे. तसेच ज्या सभासदाची आपल्या बँकेत ठेव रक्कम ₹ ७,०००/- आहे अथवा ₹१,००,०००/- पर्यंत (कुठलेही) कर्ज आहे, असे सभासद बँकेचे सक्रीय सभासद होतात. त्याचप्रमाणे पाच वर्षात किमान एक वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासदाची उपस्थिती आवश्यक असेल.

४) सभासद थकबाकीदार असल्यास अथवा थकित कर्जासाठी जामिनदार असल्यास तो किंवा ती लाभार्थी योजनेसाठी पात्र ठरणार नाहीत.

५) उपरोक्त वैद्यकीय कारणांसाठी सर्वसाधारण विम्यातून (Mediclaim Policy) रक्कम मिळाली असेल तर बँकेच्या भागधारक कल्याण निधीतून मदत दिली जाणार नाही.

**<u>- लाभार्थी योजना –</u>**

१) <u>सभासदाचे पाल्यांना शैक्षणिक गुणवत्तेसाठी खालीलप्रमाणे पुरस्कार देण्यात येतील.</u>
१० वी च्या परीक्षेत ९० % व त्याहून अधिक गूण मिळाल्यास तसेच १२ वी च्या परीक्षेत ८५ % व त्याहून अधिक गूण मिळाल्यास ₹ २,५००/- देण्यात येतील.
कला/ वाणिज्य / शास्त्र / कायदा यामध्ये मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी ७५ % गुणांनी प्राप्त केल्यास ₹ ३,५००/- देण्यात येतील.
वैद्यकीय, अभियांत्रिकी, चार्टर्ड अकाऊंटंट, कंपनी सेक्रेटरी, कॉस्ट अकाऊंटंट, आर्कीटेक्चर अशा व्यावसायिक पदवी परीक्षांमध्ये तसेच एम.सी.ए., एम.एम.एस., एलएल. एम. अशा **<u>महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्यूत्तर पदविका (पोस्ट ग्रॅज्युएशन)</u>** अशाही निरनिराळ्या प्रकारच्या व्यावसायिक विद्या शाखांच्या परीक्षांमध्ये सलगपणे उत्तीर्ण झाल्यास ₹ ५,०००/- देण्यात येतील.
(यासाठी सभासदाने पाल्याचे बाबतीत योग्य ती कागदपत्रे सादर करावीत. **<u>रक्कम खात्यात वर्ग करण्यात येईल</u>**. पुरस्कारासाठी अर्ज निकाल जाहीर झाल्यापासून ३ महिन्यांच्या आत, बँकेस सादर करावा.)

२) सभासदाला मुलगी झाल्यास त्या मुलीच्या नावे ₹ २,०००/- दीर्घ मुदत ठेवीत गुंतविण्यात येतील व ते तिला वयाच्या १८ व्या वर्षी मिळतील. (जास्तीत-जास्त २ अपत्ये. जन्मानंतर तीन महिन्यांच्या आत अर्ज करणे आवश्यक. सोबत – जन्मदाखला.)

३) सभासदाचे वय ५० पेक्षा कमी असताना नैसर्गिक अथवा अपघाती निधन झाल्यास त्याच्या वारसांना मदतीपोटी दिली जाणारी रक्कम ₹ १०,०००/- (निधनानंतर तीन महिन्यांच्या आत अर्ज करणे आवश्यक. सोबत – मृत्यूचा दाखला.)

४) कोणत्याही क्षेत्रात डॉक्टरेट (PHD)मिळविणाऱ्या सभासदास ₹ १०,०००/-
सहकार क्षेत्रात डॉक्टरेट (PHD) मिळविणाऱ्या सभासदास ₹ १५,०००/-
(निकालानंतर तीन महिन्यांच्या आत अर्ज सादर करणे आवश्यक. )

५) सभासदांच्या कुटुंबातील (पती, पत्नी, मुले व आई तसेच वडील) मानसिक रुग्ण, सेरेब्रल पाल्सी अथवा अपंग असलेल्या व्यक्तीच्या पालनपोषणासाठी अथवा शिक्षणासाठी आर्थिक मदत
अंशतः अपंगत्व - ₹ ५,०००/-, पूर्णतः अपंगत्व - ₹ १०,०००/-

६) सभासद व त्याच्या कुटुंबातील व्यक्तींच्या विविध प्रकारच्या गंभीर व कायमस्वरुपाच्या आजारांसाठी (आजारांचे स्वरूप बायपास सर्जरी, ॲन्जियोप्लास्टी, ब्रेन सर्जरी, पॅरालिसीस (दीर्घकालीन परिणाम करणारा), डायलिसीस, गुढगा प्रत्यारोपण (नी रिप्लेसमेंट), कॅन्सर, ट्यूमर, किडणी ट्रान्सप्लांट, अल्झायमर, पार्कींसन्स इत्यादी) - वैद्यकीय मदत रु. १५,०००/-, अर्ज सहा महिन्यांच्या आत योग्य कागदपत्रांसह दाखल करावा. ज्या सभासदाचे वार्षिक उत्पन्न ₹ ६,००,०००/- लाखांपेक्षा अधिक आहे अशांनी मदतीसाठी अर्ज करू नये.

<u>**(उपरोक्त क्र. ५ व ६ साठी नियम :-**</u> सभासदावर अवलंबून असलेले पती /पत्नी/ आई/ वडील/ अविवाहित मुलगा / मुलगी. मात्र, ज्यांचे कमाल वय २५ वर्षे असेल अशांनाच याचा लाभ घेता येईल.)

७) अपघातामुळे करावी लागणारी सभासदाची शस्त्रक्रिया-
- सर्वसाधारण तसेच ऑर्थोपेडिक शस्त्रक्रियेसाठी ₹ ७,५००/-
- मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी ₹ ३,०००/-

(अर्ज सहा महिन्यांच्या आत योग्य कागदपत्रांसह दाखल करावा.
ज्या सभासदाचे वार्षिक उत्पन्न ₹ ३,००,०००/- लाखांपेक्षा अधिक आहे अशांनी मदतीसाठी अर्ज करू नये. )

<u>**(उपरोक्त क्र. ५, ६ व ७ साठी नियम :-**</u>सभासदास उपरोक्त तिन्हीसाठी मिळून एकदाच अर्ज करता येईल.)

८) महिला सभासदांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन व विजेत्या महिला सभासदांना बक्षीस योजना. बक्षीसांसह स्पर्धेच्या एकूण खर्चाची मर्यादा रु. १०,०००/-. या स्पर्धा कार्यकारी मंडळाच्या निर्णयानुसार जरुर त्या कालावधीने घ्याव्या.

९) सभासदाचे पाल्य वय वर्षे ८ ते १४ गटासाठी चित्रकला नैपुण्य स्पर्धा बक्षिसाची एकूण रक्कम रु.१०,०००/- . <u>**या स्पर्धा कार्यकारी मंडळाच्या निर्णयानुसार जरुर त्या कालावधीने घ्याव्या.**</u>

१०) शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, खेळ, शौर्य, उद्योग- व्यवसाय यात राज्य स्तरावर, देश स्तरावर, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राविण्य अथवा विशेष सन्मान प्राप्त करणाऱ्या प्रत्येक सभासदास तसेच सभासद पाल्यास रु. १०,०००/- पर्यंत रोख बक्षीस.

११) महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात वा दलित तसेच शोषित - वंचित आणि उपेक्षित अशा समाजघटकांसाठी कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थेचा अथवा व्यक्तीचा गौरव करणे व ₹ १,००,०००/- पर्यंत पुरस्कार, मानपत्र देणे असा कार्यक्रम करावा. निवड समिती गठित करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील आणि कार्यकारी सदस्य या निवड समितीवर असणार नाहीत. निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.